दैनिक साप्ताहिक आपल्या सर्वांचे लोकप्रिय वृत्तपत्र

# अक्षर वार्ता

संपादक – संजय आ.हंगे मो.९७६६२६८४१५

DAINIK SAPTAHIK AKSHAR VARTA

कार्यकारी संपादक – सुमन डापकर मो.८७८८२५१११४

बीड (महाराष्ट्र) वर्ष ४ थे, अंक ३१९ मंगळवार १५ जूलै २०२५ RNI Reg.NO./2021/83381 E-mail : aksharwartanews@gmail.com पृष्टे : ४ किंमत २ रुपये

BEED (MAHARASHTRA) Year 4 Issue 319 Tuesday 15 JULY RNI Reg.NO./2021/83381 E-mail :akasharwartanews@gmail.com Pages 4 Prise Rs.2

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# ज्ञानराधा मल्टीस्टेट सोसायटीच्या आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी तत्काळ कारवाई करा- मुख्यमंत्री

बीड प्रतिनिधी-बीडमधील सर्व मल्टीस्टेट सहकारी क्रेडीट सोसायटीच्याआर्थिक व्यवहारांची चौकशी करून अहवाल सादर करावामुंबई, दि. १४ : ठेवीदारांना न्याय देण्यासाठी बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटीतील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी संबंधित आरोपींवर तत्काळ कारवाई करावी. तसेच सोसायटीच्या उर्वरित २३८ मालमत्ता तातडीने जप्त करण्याचे, निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.ज्ञानराधा मलटीस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी ने मुदत ठेव, बचत ठेव, चक्रवर्ती ठेवींवर १० ते १८ टक्के व्याजदराचे आकर्षण ठेव योजनांचे आमिष दाखवून ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी विधानभवन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संबंधित पोलीस, विशेष तपास यंत्रणांना गतीने काम करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री.



फडणवीस यांनी दिले.यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, पणन मंत्री जयकुमार रावल, मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार प्रकाश सोळंके, अर्जुन खोतकर, सुरेश धस, संतोष दानवे, सुभाष देशमुख, विजयसिंह पंडित, रत्नाकर गंगारवेड, अपर पोलीस अधीक्षक किरण पाटील, उपअधिक्षक शशिकांत सावंत, अतिरिक्त मुख्य सचिव इकबाल सिंह चहल, प्रधान सचिव सहकार व पणन, सहकार आयुक्त उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, अनेक सामान्य आणि गोरगरीब ठेवीदारांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास येत आहे. त्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी यंत्रणांनी तातडीने कार्यवाही करावी. या प्रकरणाची सखोल चौकशी करून, संबंधित १९ आरोपींवर तातडीने कारवाई करण्यात यावी. बहुराज्य सहकारी संस्था नियंत्रक विभागामार्फत सोसायटीच्या उर्वरित २३८ मालमत्ता तातडीने जप्त करा, त्यासाठी विशेष मोहीम राबवावी. बीड जिल्ह्यातील सर्व मल्टीस्टेट सोसायट्यांच्या पार्श्वभूमीवर संबंधित विभागांनी एकत्रित बैठक घेऊन सविस्तर अहवाल सादर करावा. फसवणूक झालेल्या ठेवीदारांना दिलासा देण्यासाठी ही कारवाई आवश्यक असून, या प्रकरणांमध्ये कठोर आणि वेळेत निर्णय घेण्यात येतील, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## मद्यविक्रीचे नवे परवाने दिले जाणार नाहीत; उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांची ग्वाही

मुंबई वृत्तसेवा : राज्यात मद्यविक्रीचे नवे परवाने दिले जाणार नाहीत, अशी ग्वाही राज्याचे उत्पादन शुल्क तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी पुण्यामध्ये दिली. आपला मुलगा जय पवार याच्या मद्य निर्माण कंपनीला लाभ होईल असा कोणताही निर्णय उत्पादन शुल्क विभागाने घेतलेला नसून तसे असेल तर मला पुरवा द्या, अशी विचारणा अजित पवार यांनी हिंजवाडी पाहणी दौऱ्यामध्ये पत्रकारांना केली.गृहविभागाने २६ जून रोजी शासन निर्णय प्रसिद्ध केला असून त्यामध्ये राज्यातील ४१ विदेशी मद्य उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना उत्पादन शुल्क विभागाच्या ८ महसुली विभागात प्रत्येक एक असे एकुण ३२८ किरकोळ मद्यविक्री दुकानाचे परवाने (एफएल २) दिले जाणार आहेत. लोकसत्ताने रविवारी यासदंर्भातील वृत्त दिले होते.१९७४ पासूनराज्यात किरकोळ मद्यविक्री दुकानांचे परवाने देणे बंद आहे. विधिमंडळाला विश्वासात घेतल्याशिवाय परवाने देता येत नाहीत. सध्या मद्यविक्रीची दुकाने स्थलांतर करता येतात. त्यासदंर्भातही जिल्हाधिकारी आणि उत्पादन शुल्क अधिक्षकाची समिती निर्णय घेते. माजी मंत्री संदीपान भुमरे यांच्या नातेवाईकांचा मद्यविक्रीचा परवाना हा २४ तासामध्ये स्थलांतरीत झाला, ही बाब असत्य आहे. वर्ष २०२३ मधले भुमरेयांचे प्रकरण आहे. हा परवाना स्थलांतर करण्यास दिड महिन्याचा कालावधी लागला, असे अजित पवार यांनी सांगितले.समितीमधून पवारांना हटवा : अंजली



दमानियाउपमुख्यमंत्री अजित पवार हेउत्पादन शुल्क मंत्री, तसेच ते अनेक साखर कारखान्यांचे संचालक आहेत. त्यांच्या मालकीचे अनेक खाजगी साखर कारखाने आहेत. मद्य उत्पादन करणाऱ्या कॅपोविटज प्रा. लि. कंपनीत त्यांचा मुलग जय पवार हे भागीदार आहेत. मद्य उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना मद्यविक्रीचे नवे परवाने देण्याचे अजित पवार यांच्या विभागाने धोरण बनवले आहे. म्हणून मद्यविक्री दुकानांना परवाने देण्याची मंत्री उपसमिती आहे, तिच्या अध्यक्षपदावरुन अजित पवार यांना हटवण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली पान २ वर...

## निवडणूक आयोगाला तो अधिकार नक्कीच नाही? उद्धव ठाकरे

मुंबई वृत्तसेवा शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हाचं प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात आहे, शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर पक्षाचं चिन्ह आणि नाव हे शिवेसना शिंदे गटाला देण्याचा निर्णय निवडणूक आयोगानं घेतला होता, त्याविरोधात शिवसेना ठाकरे गटानं सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.दरम्यान या प्रकरणावर आता ऑगस्टमध्ये सुनावणी होणार आहे. यावर आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.नेमकं काय म्हणाले उद्धव ठाकरे?ङ्गऑगस्टमध्ये निकाल देणार असतील तर नक्कीच एक समाधानकारक गोष्ट आहे. आणि आमची शेवटची एक आशा आता सर्वोच्च न्यायालयच आहे, जिथे या चोरीच्या प्रकरणाचा न्याय निवाडा होईल. कारण आज आमचे जे चिन्ह चोरलं गेलं आहे. मी नेहमी सांगतो, निवडणूक आयोगाला चिन्ह देण्याचा अधिकार आहे, परंतु पक्षाचं नाव बदलण्याचा अधिकार नाही. कोणाचं नाव उचलून दुसऱ्याला द्यायचं हा अधिकार निवडणूक आयोगाला नक्कीच नाही. त्यांना तो अधिकार असूच शकत नाही, आणि आम्ही तो मान्यही करत नाही. निवडणूक चिन्हाबाबत म्हणाल तर ठीक आहे, आणि त्याबाबत देखील प्रकरण कोर्टात आहे,फ असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.दरम्यान यावेळी बोलताना इंडिया आघाडीची बैठक झाली पाहिजे असं देखील त्यांनी म्हटलं



आहे. लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडीची बैठक झालेली नाही, मला वाटतं लवकरात लवकर बैठक झाली पाहिजे. बिहारमध्ये निवडणुका आहेत, इतरही राज्यात निवडणुका आहेत, महाराष्ट्रात देखील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत, त्यामुळे बैठक तर झालीच पाहिजे असं उद्धव ठाकरे यांनी यावेळी म्हटलं आहे.न्यायालयात नेमकं काय घडलं?न्यायालयात ज्येष्ठ विधितज्ज्ञ कपिल सिब्बल यांनी शिवसेना ठाकरे गटाची बाजू मांडली. यावेळी बोलताना कपिल सिब्बल यांनी या प्रकरणावर पान २ वर...

## होळ येथील राशन दुकानातून टेम्पोने आणलेले धान्य धारुरमध्ये पकडले!

**पोलिसांची कारवाई; राशन दुकानदार अशोक घुगेकडून माल आणल्याची पंचनाम्यात कबुली**



धारूर (मनोज जगताप)दि.१४ : केज तालुक्यातील होळ येथील राशन दुकानातून टेम्पोने काळ्या बाजारात विक्रीसाठी जात असलेला गहू पोलिसांनी पाठलाग करून धारूर शहरातील एका दुकानासमोर पकडला. ही कारवाई पोलिसांनी सोमवारी (दि.१४) दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास केली. याचा पंचनामा सुरू असून पुढील कार्यवाही केली जाईल, अशी माहिती धारुरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी दिली आहे. दरम्यान, सदरील धान्य होळ येथील राशन दुकानदार अशोक तुकाराम घुगे याच्याकडून विक्रीसाठी आणल्याची कबुली वाहनचालकाने दिली आहे.आडस येथील चौकात उभे असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना आडसमधून धारूरच्या दिशेने जात असलेला छोटा टेम्पो (क्र.एम.एच. ४४ यू २२५७) दिसून आला. पोलिसांना संशयास्पद वाटल्याने त्याचा पाठलाग केला. तेव्हा धारूरमधील एका धान्याच्या दुकानासमोर टेम्पो उभा दिसून आला. यावेळी पोलिसांनी चौकशी केली असताना चालकाने त्याचे नाव इब्राहिम खाजा (रा.धारुर) असे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडे केलेल्या चौकशीत धान्याच्या कसल्याही पावत्या आढळून आल्या नाहीत, तसेच सदरील धान्य राशनचे असल्याचा संशय आल्यावरून पंचनामा केला. यावेळी वाहन चालकाने होळ येथील राशन दुकानदार अशोक तुकाराम घुगे याच्याकडून माल घेऊन धारूरच्या मोंढ्यात विक्रीसाठी देत असल्याची कबुली पंचनाम्यात दिली. सहाय्यक पोलीस निरीक्षक पान २ वर...

## मद्यधुंद चालक-वाहकांनी दामटली बस; बीडजवळ प्रकार उघडकीस, प्रवाशांची घाबरगुंडी, गुन्हा नोंद

बीड प्रतिनिधी: दारूच्या नशेतील चालक-वाहक पंढरपूर-अकोट बस दामटवत असल्याचे लक्षात येताच प्रवाशांची एकच घाबरगुंडी उडाली. त्यात काहींनी फोनाफानी करून नातेवाइकांना माहिती दिल्यानंतर हे प्रकरण मुंबईतील एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयापर्यंत पोचले.त्यानंतर शुक्रवारी (ता.११) रात्री पावणेअकराला बीडच्या वाहतूक निरीक्षकांनी पाली येथे धाव घेत दोघांचाही समाचार घेतला. याप्रकरणी बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला. राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अकोट (जि. अकोला) आगाराची बस शुक्रवारी पंढरपूरहून अकोटकडे जात होती.त्यातच बीड तालुक्यातील पालीजवळ रात्री थांबली होती. या बसमध्ये दोन लहान मुलांसह ३६ प्रवासी बसलेले होते. दरम्यान, या बसमधील




चालक एस.ए. रहाटे (वय ४८) आणि वाहक मंगेश झालटे (वय ३६, दोघे रा. अकोट) हे दोघेही दारूच्या नशेत धुंद असल्याचे प्रवाशांच्या लक्षात आले. त्यानंतर एकच गोंधळ उडाला.भयभीत झालेल्या काही प्रवाशांनी लगेच नातेवाइकांना फोन करून याबाबत माहिती दिली. त्यामुळे मुंबई येथील एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयापर्यंत फोनद्वारे ही माहिती पोचली. घटनेचे गांभीर्य ओळखून मध्यवर्ती कार्यालयाने बीडच्या वाहतूक निरीक्षक ज्योती नागरगोजे यांनी रात्री पावणे अकराला कळवत कार्यवाहीच्या सूचना केल्या.त्यामुळे नागरगोजे यांनी पथकासह पाली येथे धाव घेतली. तेथे पाहणी केली असता चालक रहाटे आणि वाहक झालटे हे मद्यधुंद अवस्थेत आढळून आले. त्यांना या पथकाने बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात आणले. नंतर वैद्यकीय तपासणीसाठी सामान्य रुग्णालयात नेले. प्राथमिक अहवालात ते दारूच्या नशेत असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी दोघांविरोधात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.






# मैं बीज हुं, आदत है मेरी, बार बार उग जाने की!

*कवितेच्या ओळी अनुषंगिक वाटत असल्या तरी त्या तंतोतंत लागू पडणाऱ्या आहेत. त्याचं कारण असं आहे की, धनंजय मुंडे हे नेतृत्व संपवण्याचा प्रयत्न होण्याची ही काही पहिली वेळ नाही! तसं यावेळी जरा अतीच झालं म्हणावं लागेल मात्र अशा प्रकारचे आघात हे या व्यक्तीसाठी काही नवीन नाहीत.*

**आयुष्यात लढविलेली पहिली जिल्हा परिषद निवडणूक ही त्या सुप्त संघर्षाची सुरुवात होती, सोप्या आणि जवळच्या जागा सोडून त्या काळी म्हणजे २००२ साली बीड जिल्ह्याची गडचिरोली म्हणवल्या जाणाऱ्या पट्टीवडगाव सर्कल मधून लढावे लागले. कदाचित संघर्ष हा यांच्या पाचवीला पुजलेला असावा, त्यामुळे आजवर जे मिळाले त्यातले सहज हाती लागले असे काहीच नाही.**

**कधी नियतीने तर कधी व्यक्ती द्वेषाने धनंजय मुंडे यांना अनेक हल्ले सहन करून प्रतिहल्ला न करता संयमाने परतवून लावावे लागले; याची शेकड्याने उदाहरणे देता येतील. पण त्या प्रत्येक आघातातून कुणालाही न दुखावता किंवा फारसे डॅमेज न होऊ देता अत्यंत धीरोदात्त पणे लढून धनंजय मुंडे इथपर्यंत पोचले. त्यात सगळ्यात मोठा वाटा प्रभू वैद्यनाथ नगरी अर्थात परळीतील जनतेचा आहे. आजवर परळीची ही माय बाप जनता प्रत्येक वेळी, प्रत्येक संघर्षात धनंजय नावाभोवती एक अभेद्य तटबंदी बनून उभी राहिली आहे.**

म्हणूनच नेहमी म्हटले जाते की एखादे नेतृत्व घडायला अनेक दशके लागतात, अनेक प्रकारचा त्याग, बलिदान, उपासना आणि संघर्ष त्यामागे दडलेला असतो. ज्याने या सर्व गोष्टी सहन केल्यात त्याला संपवण्याची सुपारी तितकी सोपी नाही! लोकसभा निवडणुकीतील धनंजय मुंडे यांचे समर्पण सर्वांनी डोळ्यांनी पाहिले. निसटता पराभव झाला तो स्वीकारून पुन्हा ते कामाला लागले.





विधानसभा निवडणुकीत इतर मतदारसंघात ३२ पेक्षा अधिक सभा घेतल्या. इतकेच नाही तर स्वतः उमेदवार असून सुध्दा अगदी मतदानाच्या आदल्या रात्री अगदी पहाटेच्या दोन वाजेपर्यंत आपल्या गेवराई च्या बंधूंच्या प्रचारार्थ बैठका घेत होते. परळीच्या अभेद्य किल्ल्याने धनंजय मुंडे या नावाभोवती महाराष्ट्रातील क्रमांक दोनची लीड उभी केली. त्यादिवशी अनेकांनी बांगड्या फोडल्या... अनेक आरोप केले त्या सर्वांच्या तोंडावर स्वतः निवडणूक आयोगाने क्लीनचीट चिटकवली, तरीही बदनामी सुरूच! पण खवळलेला विरोध आणि संपवायची सुपारी परळी पासून शेकडो किलोमीटर वरती शिजत होती; त

त्यामुळे जातीचे लेबल लावून त्यांची बदनामी करणे म्हणजे अत्यंत ङ्गङ्घछोटी सोचङ्गङ्घ ठरेल. मीडिया ट्रायल, व्यक्तिगत आरोप, बदनामी हे सगळे इतक्या टोकाला पोचवले गेले की त्यांचा परिणाम स्वतःच्या तब्येतीवर सुध्दा झाला.

ज्या माणसाच्या जिभेवर माता सरस्वती वास करते, त्या व्यक्तीला एका आजारामुळे जवळ जवळ तीन महिने बोलता येईना, सतत माणसात राहणे, बोलणे, भाषणे,



संवाद अशी आयुष्याची शिदोरी असलेल्या व्यक्तीला तीन महिने बोलता येत नाही, तेव्हा त्यांच्या मनाला त्याच्या किती वेदना होत असतील? पण दुसरीकडे राजीनामा आणि दीर्घकाळ मुंडेंचे मौन याचा अर्थ सुपारी बहाद्दर गँग ने काढला की आता धनंजय मुंडे संपले! राज्यात स्वकर्तृत्वावर मोठे झालेले व आपल्या पक्षासह मित्रपक्षात देखील तितकेच वजन असणारे धनंजय मुंडे हे नाव गप्प बसणाऱ्या किंवा सहज सर्वकाही मागे सोडून देणाऱ्यापैकी नाही. याची प्रचिती आगामी निवडणुकांच्या काळात येईलच! निष्ठावंत कार्यकर्त्यांची मजबूत फळी, बेरजेचे राजकारण, मोकळे व



मोठे मन आणि फर्डे वक्तृत्व कौशल्य ही राजकारणात कायमच त्यांची जमेची बाजू राहिलेली आहे. त्यामुळे मुंडे यांचे मौन आता अल्पकालीन आहे, हे स्पष्ट आहे आणि त्याची प्रचिती सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात दिसून आली.आजवर झालेले घात - आघात सहन करून त्यातून वाट काढत धनंजय मुंडे हे पुन्हा एकदा सुपारी देणाऱ्या आणि घेणाऱ्यांचे दात घशात घालून नवी उसळी घेणार आणि पूर्वीपेक्षा अधिक जोमाने, अधिक उत्साहाने राजकारणातील राजहंस बनण्याच्या मार्गावर मार्गक्रमण करणार हे निश्चित आहे. मागील वर्षी एका भाषणात ते म्हणले होते, ङ्गङ्घ कई लोगों ने कोशिश



की, मुझे मिट्टी मे दबाने की, मैं बीज हुं, आदत है मेरी, बार बार उग जाने की! ङ्गङ्घया काव्यपंक्ती प्रमाणे निश्चितच जितक्या वेळा धनंजय मुंडेंना दाबण्याचे, संपवण्याचे प्रयत्न होतील, तितक्याच ताकदीने ते पुन्हा उसळणार आणि एक लोकमान्य लोकनेतृत्व होण्याच्या दिशेने गतिमान वाटचाल करणार... हे नक्की आहे! सन्माननीय श्री. धनंजय मुंडे यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने



**शब्दरूपी शुभेच्छा!**

**सुधीर सांगळे, बीड**

## वटवृक्षाचा वाढदिवस साजरा करताना जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे विद्यार्थी व शिक्षक

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा येथील केंद्रीय प्राथमिक जिल्हा परिषद शाळेने नुकताच एक अतिशय अनोखा आणि प्रेरणादायी उपक्रम राबवला. वाढदिवस नेहमी माणसांचा साजरा होतो, पण या शाळेच्या विद्यार्थी आणि शिक्षकांनी चक्क एका वटवृक्षाचा वाढदिवस साजरा करून पर्यावरणाबद्दलची आपली बांधिलकी दाखवून दिली.या अनोख्या वाढदिवस सोहळ्या निमित्त शाळेचे विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वप्रथम, या वटवृक्षाची पूजा करून त्याला फुलांनी आणि माळांनी सजवण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उत्साहाला उधाण आले



होते. त्फ्फ्या वाढदिवसाच्या निमित्ताने शाळेच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने वेगवेगळ्या प्रकारची झाडे लावली आणि त्यांच्या संगोपनाची शपथ घेतली.हा उपक्रम केवळ एका झाडाचा वाढदिवस साजरा करण्यापुरता मर्यादित नव्हता, तर तो पर्यावरणाचे महत्त्व आणि प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये निसर्गाप्रती आदर निर्माण करण्याचा एक प्रयत्न होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुरेखा खेडकर मॅडम यांनी केले

## धारूर येथील आरुष अबॅकस क्लासेस चे नॅशनल कॉम्पिटिशन मध्ये नेत्रदीपक यश

### विद्यार्थ्यांवर ट्रॉफ्यांचा वर्षाव;सेंटरला मिळाला बेस्ट सेंटर अवार्ड व दहा हजार रुपयांचा धनादेश

धारूर (मनोज जगताप) किल्ले धारूर शहरासह तालुक्यात व तालुक्याबाहेर शैक्षणिक क्षेत्रात जोमाने कार्य करत असणाऱ्या धारूर येथील आरुष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेस ने १३ जुलै रोजी बीड या ठिकाणी संपन्न झालेल्या प्रोऍक्टिव्ह अबॅकस च्या नॅशनल समर कॉम्पिटिशन२०२५ मध्ये नेत्रदीपक यश संपादन केले आहे या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन होत आहे. अबॅकस चा नंबर वन ब्रँड असणाऱ्या प्रोऍक्टिव्ह अबॅकस ने १३ जुलै २०२५ रोजी बीड या ठिकाणी नॅशनल समर कॉम्पिटिशन चे आयोजन करण्यात आले होते या समोर कॉम्पिटिशनमध्ये धाराशिव,अहिल्यानगर,नांदेड,लातूर व बीड या ठिकाणचे




विद्यार्थी या कॉम्पिटिशनमध्ये सहभागी झाले होते यात किल्ले धारूर येथील आरुष प्रोडक्टिव्ह अबॅकस क्लासेस चे विद्यार्थीही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते त्यामध्ये २७ विद्यार्थी प्रथम द्वितीय व तृतीय रँक मध्ये आहेत तर ३१ विद्यार्थी हे चौथ्या ते सातव्या रँक मध्ये आहेत,या सर्व विद्यार्थ्यांना प्रोऍक्टिव्ह अबॅकस ने ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले आहे. प्रोऍक्टिव्ह अबॅकस चा बेस्ट सेंटर अवार्ड ही धारूर येथील आरुष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेस ला मिळाला आहे यात दहा हजार रुपयांचा धनादेश देऊन आरुष प्रोऍक्टिव्ह अबॅकसचे संचालक प्रा.अविनाश जगताप व संचालिका शितल जगताप यांना सन्मानित केले आहे.विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशाबद्दल आरुष प्रोऍक्टिव्ह अबॅकस क्लासेसचे संचालक अविनाश जगताप सर,संचालिका शितल जगताप मॅडम यांच्यासह पालकांतून व शैक्षणिक स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

### विनायकराव मेटे यांच्या जयंती निमित्त शिवसंग्रामचे मुंबईत जोरदार शक्तिप्रदर्शन विनायकराव मेटे यांच्या आठवणींना उजाळा देताना अनेकांच्या डोळ्यात अश्रूनिष्ठा

## काय चीज असते ती पाहायच असेल तर त्यांनी मेटे साहेबांच्या शिवसंग्रामला पहावे - डॉ. ज्योती मेटे

### सुप्रद्धी छावा चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी वाहिली श्रद्धांजली निष्ठावंत शिवसंग्राम कार्यकर्त्यांना पाच लाख रुपयांचे विमा सुरक्षा कवच

मुंबई (प्रतिनिधी) शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांची जयंती भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा येथे दि. १३ जुलै रविवार रोजी दुपारी ०४:०० वाजता मुंबई शिवसंग्रामच्या वतीने साजरी करण्यात आली.ङ्घङ्घआठवणीतील मेटे साहेबङ्घङ्घ या अभिवादन कार्यक्रमास अनेक मान्यवरांसह प्रशासकीय सेवेतील सनदी अधिकारी आणि सुप्रसिद्ध छावा चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अनेकांनी विनायकराव मेटे यांच्या आठवणींना उजाळा दिला तर शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांचे पहिल्यांदाच आक्रमक भाषण ऐकायला मिळाले.आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबईत मोलमजुरी करण्यासाठी बीड जिल्ह्यातून आलेले विनायकराव मेटे हे सलग पाच वेळा आमदार होतील असे स्वप्नात ही वाटत नव्हते नुसते आमदारच नाही तर त्यांनी शिवसंग्राम संघटना स्थापन करून उभ्या महाराष्ट्रात आपल्या कार्यकर्त्यांची फौज तयार केली आणि महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळा ठसा उमटवला मराठा, धनगर , मुस्लिम आरक्षण , शिवस्मारक , आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना, शेतकरी पेन्शन योजना, व्यसनमुक्ती अभियान यासारख्या अनेक गोष्टीवर काम करत असताना त्यांनी आपल्या नावाचे एक वेगळे वलय निर्माण केले होते.



मराठा आरक्षणावर विधिमंडळात आणि न्यायालयात त्यांची मोठी योगदान होते. परंतु या अद्वितीय नेत्याच्या जाण्याने आज त्यांची जयंती साजरी करण्याची दुर्दैवी वेळ त्यांच्या सर्व हितचिंतकांवर आली आहे. आज आपल्या नेत्याला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी मुंबई सह महाराष्ट्रातून असंख्य चाहत्यांनी वडाळा येथील भारतीय क्रीडा मंडळ परिसरात मोठी गर्दी केली होती.यावेळी मंचावर उपस्थित मा. आयएएस. अधिकारी श्री. निर्मलकुमार देशमुख, मुंबई महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता श्री.नवनाथ घाडगे, सेवानिवृत्त मुख्य अभियंता श्री. पी. वाय. देशमुख, जागतिक कीर्तीचे स्त्री रोग तज्ञ डॉ.प्रवीण म्हात्रे ,राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे श्री. प्रमोद हिंदूराव, शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष श्री. प्रभाकर कोलंगडे ,शेखर पवार, मीरा-भाईंदरचे नगरसेवक श्री.अनिल भोसले,श्री. संजय सिंघन आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक शिवसंग्रामचे ज्येष्ठ नेते नारायणराव काशीद यांनी केले तर आभार प्रदर्शन योगेश विचारे यांनी केले.मुंबई शिवसंग्रामच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या अभिवादन कार्यक्रमास नेहमी शांत आणि संयमी पहावयास मिळालेल्या शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे कमालीच्या आक्रमक पहावयास मिळाल्या लोकनेते विनायकराव मेटे यांच्या आठवणींना उजाळा देत असतानाच त्यांनी शिवसंग्रामच्या मावळ्यांना खचून न जाता धैर्याने लढा असा संदेश दिला त्याचबरोबर जर कोणाला निष्ठा काय चीज असते ती पाहायच असेल तर त्यांनी मेटे साहेबांची शिवसंग्रामला पाहायला हवी या निष्ठे बद्दल आणि माझ्यावर विश्वास ठेवल्या बद्दल मी तुम्हला सर्वांना सलाम करते. आणि याच निष्ठावंत कार्यकर्त्यांना जपण्यासाठी आज गतवर्षीप्रमाणेच यावर्षी देखील आपण शिवसंग्रामच्या सर्व कार्यकर्ते पदाधिकारी यांचा विमा उतरवला आहे.

मेटे साहेबांच्या आरक्षण लढ्यात मी त्यांची साक्षीदार राहिली आहे. आरक्षणविषयक कायदेशीर बाबींवर नेहमी त्यांच्याशी चर्चा व्हायची मराठा आरक्षण न्यायालय त्यांचे मोठे योगदान होते आणि ज्या ज्या वेळी मेटे साहेबांना मदत लागायची त्यावेळी पडद्यामागून मी त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभी असायचे मेटे साहेब काम करताना त्यांचा वैयक्तिक हेतू काही नव्हता ज्या जातीत जन्मलो त्याला न्याय देण हे त्यांचे काम होत. मराठा आरक्षणावर बोलताना अनेकजण मेटे साहेबांच नाव टाळयचे फोटो येऊ द्यायचे नाहीत याने त्यांना काय सिद्ध करायचं आहे? असा सवालही त्यांनी यावेळी विचारला साहेबांचा वसा आणि वारसा आपण पुढे घेऊन जातोय हे आपण ठामपणे सांगू शकतो. अवरीत विश्वासाने माझ्यावर जी धुरा तुम्ही दिली ती मी पेलायला मी सक्षम आहे. जयंती म्हणजे इतराना साधं सरळ असू शकत पण पत्नीला जयंती म्हणणं माझ्या वाट्याला यावं हे अत्यंत वाईट आहे. असे प्रतिपादन त्यांनी या वेळी केले.प्रचंड गर्दी आणि सभागृह फुल ज्या सभागृहात लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांना अभिवादन करण्यात येणार होते त्या ठिकाणी सकाळपासूनच चाहत्यांनी गर्दी केली होती कार्यक्रम सुरू झाला तेव्हा अक्षरशः सभागृह तुडुंब भरले होते आणि सभागृहाबाहेर देखील तितकाच जनसमुदाय उपस्थित होता. यावेळी शिवसंग्राम ची मुंबईतील ताकद पहावयास मिळाली. छावा चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकरांची उपस्थितीसुप्रद्धी छावा चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी या अभिवादन कार्यक्रमास आवर्जून उपस्थिती लावली यावेळी त्यांनी लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या प्रेमाखातर आज आपण इतर उपस्थित असल्याचे सांगितले. यावेळी उतेकर उपस्थित होताच संभाजी महाराजांच्या घोषणांनी सभागृह दणाणून गेले.

# काँग्रेसला मोठा धक्का, शरद पवारांसह ७५ खासदार निवृत्त होणार, राजकारण तापणार

सध्या संपूर्ण देशाचे लक्ष बिहार विधानसभा निवडणुकीकडे ( २०२५) लागून आहे. बिहारमध्ये यंदा कोण बाजी मारणार याबाबत राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे.तर दुसरीकडे बिहार विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापणार आहे. याचा मुख्य कारण म्हणजे पुढील वर्षी राज्यसभेतून तब्बल ७५ खासदार निवृत्त ( ) होणार आहे. त्यामुळे सत्ताधारी एनडीए () आणि इंडिया आघाडीमध्ये ( ) यावरुन चांगलंच राजकारण पाहायला मिळणार आहे.नोव्हेंबर ते एप्रिल २०२६ दरम्यान अनेक मोठे नेते राज्यसभेतून निवृत्त होणार आहे. यामध्ये शरद पवार ( ) यांच्यासह काँग्रेस () अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे ( ) , माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा, भाजप नेते हरदीप पुरी, जेडीयू खासदार हरिवंश, सपाचे खासदार राम गोपाल यादव, काँग्रेस नेते




दिग्विजय सिंह, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, प्रियंका चतुर्वेदी आणि आरएलडी नेते उपेंद्र कुशवाह यांचा समावेश आहे.या जागा भरण्यासाठी देशातील वेगवेगळ्या राज्यांमध्ये निवडणुका होणार आहे.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खग२९ जून २०२६ रोजी निवृत्त होणार आहे तर माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा आणि हरिवंश ९ एप्रिल २०२६ रोजी निवृत्त होणार आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार देखील एप्रिल २०२६ मध्ये निवृत्त होणार आहे. तर शिवसेना ठाकरे गटाच्या खासदार प्रियंका चतुर्वेदी आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्यासह महाराष्ट्रातून सात सदस्य पुढील वर्षी निवृत्त होणार आहे आणि झामुमोचे शिबू सोरेन आणि काँग्रेसचे शक्तीसिंह गोहिल हे देखील २०२६ मध्ये निवृत्त होतील.तर दुसरीकडे पुढील वर्षी राज्यसभेतून काँग्रेसचे अनेक दिग्गज नेते निवृत्त होणार असल्याने या नेत्यांना पुन्हा एकदा निवडून आणण्यात काँग्रेसला मोठी अडचण निर्माण होणार आहे. सध्या कर्नाटक, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणामध्ये काँग्रेसची सरकार आहे. त्यामुळे कमी जागांवर अधिक दावेदार असल्याने काँग्रेस कोणाला संधी देणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. तर द्रमुकचे विल्सन आणि पीएमकेचे डॉ. अंबुमणी रामदास यांच्यासह सहा नेते २४ जुलै रोजी निवृत्त होणार आहे.काही दिवसांपूर्वी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राज्यसभेत चार सदस्यांना नामांकित केले होते. यामुळे राज्यसभेची संख्या २३६ वरून २४० झाली आहे, परंतु २४ जुलै रोजी सहा सदस्यांच्या निवृत्तीनंतर ही संख्या पुन्हा २३५ होणार आहे.

# अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे जनसुरक्षा विधेयक रद्द करा डॉ. संजय तांदळे

बीड (प्रतिनिधी ) : महाराष्ट्र सरकारने जनसुरक्षा विधेयक गुरुवारी विधानसभेत आणि शुक्रवारी वरिष्ठ सभागृह म्हणजे विधान परिषदेत आवाजी मतदानाने पारित करण्यात आले. जनसुरक्षा विधेयक सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते संविधान रक्षणासाठी लढणारी मानवाधिकारी कार्यकर्ते, पत्रकार संघटना, सामाजिक कार्यकर्ते संघटना, यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे, आंदोलनाचा आवाज दाबणारे आणि लोकशाही अस्थिर करणारे असून हुकूमशाही कडे वाटचाल करणारे राजकीय हेतूने प्रेरित राजकीय अजेंडा राबविण्यासाठी मंजूर केलेले विधेयक आहे. एकीकडे नक्षलवाद आणि दहशतवादाचा बिमोड करायचा असे सांगितले जाते. परंतु जनसुरक्षा विधेयकात कुठेही नक्षलवाद किंवा दहशतवाद हा शब्द नाही. राज्यातील नक्षलवाद संपला आहे असं सारकार म्हणत असताना मग जन सुरक्षा कायदा कोणासाठी असाही प्रश्न उपस्थित होतो. व्यक्ती वा संघटना यांनी शाब्दिक अथवा कृतीद्वारे सार्वजनिक सुरक्षा, शांतता, सौहार्द यांस धोका निर्माण करणे वा शांतता सौहार्द राखणाच्या सरकारच्या प्रयत्नात ढवळाढवळ करणे ,प्रशासनास वा सरकारी




कर्मचाऱ्यांच्या जबाबदारी निर्वहनात अडथळा आणणे, हिंसक कृत्य करणे वा हिंसाचारास उत्तेजन देणे, जनतेच्या मनात दहशत निर्माण होईल असे कृत्य करणे ,आज्ञाभंग वा कायदे भंगास उत्तेजन व हे सर्व करण्यासाठी निधी वा सामग्री जमा करणे इत्यादींचा जन सुरक्षा कायद्यात उल्लेख असून सत्ताधारी पक्ष याचा गैरवापर करण्याची दाट शक्यता असल्याने हे जन सुरक्षा नव्हे तर जनमुस्कटदाबी विधेयक तातडीने रद्द करण्यात यावे अशी मागणी बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी दि. १४ जुलै २०२५ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे .यावेळी सुदाम कोळेकर डॉ. लक्ष्मण पवळ आदींची उपस्थिती होती.

# श्री संत ज्ञानेश्वर नगर येथे उत्सहात श्रीमद् भागवत कथेला प्रारंभ

श्री संत ज्ञानेश्वर नगर बीड, येथे श्री दक्षिण मुखी हनुमान मंदिरासमोर श्री जगन्नाथ यमपुरे यांनी दिनांक १० / ०७ /२०२५ वार गुरुवार रोजी सकाळी ११.०० वाजता श्रीमद् भागवत कथेला प्रारंभ केलेला आहे.सदरील भागवत कथाकार श्री ह.भ.प. श्री कल्याण महाराज शेळके यांचे अमृतवाणी मधुन श्रवण करणेस मिळणार आहे .सदरील कथा दिनांक ०६/०९/२०२५ पर्यंत चालणार असुन कथा सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत व दुपारी १ ते २ मध्ये नाष्टा दिला जाईल व परत दुपारी २ ते ४ या वेळेत कथा होणार आहे.तसेच दुपारी ४ ते ५ यावेळेत हरिपाठ होईल. हरिपाठ नंतर ५ ते ६ वेळेत दररोज महाप्रसाद पंगत होत आहे .तरी सर्वांनी
















दोन महिने कथा श्रवण करण्याचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री जगन्नाथ यमपुरे (बापु),श्री कारभारी सानप,श्री विजय आगलावे,श्री गहिनीनाथ घोरड, श्री जोगदंड बापु,श्री अशोक शेळके,श्री गंगाधर आगरकर,श्री सत्यकुमार मोरे,श्री देवडकर तात्या, गरकळ बाबा,श्री सुदाम नखाते,श्री अशोक जोगदंड,श्री नानाभाऊ कैतके,श्री कचरू चव्हाण,श्री अर्जुन कागदे,श्री पांडुरंग भैरट,श्री सोनलाल जानवळे यांनी केले आहे

# गेवराईकरांसाठी दर सोमवारी उपलब्ध राहीन - बाळराजे पवार

गेवराई: प्रतिनिधी–: गेवराईची जनता आणि आमचं पवार घराणं, हे नाते विश्वासाने घट्ट झालेले आहे. पिढ्यांनापिढ्या आम्ही एकमेकांशी जोडलोत. गावगाडा सांभाळला की नाही, हे गेवराईकरांना चांगले माहित आहे. यापुढे ही, गेवराई शहरातील जनतेची गाऱ्हाणी ऐकून घेण्यासाठी दर सोमवारी गेवराई नगर परिषदेच्या सभागृहात येणार आहे. अशी स्पष्ट भूमिका बाळराजे पवार यांनी येथे बोलताना मांडली आहे. सोमवार ता. १४ रोजी बाळराजे पवार यांनी गेवराई नगर परिषदेच्या सभागृहात आढावा बैठक घेऊन शहरातील नागरीकांच्या समस्या जाणून घेतल्या. ते म्हणाले,नगरपालिका ही संस्था शहरातील समास्यांचे निराकरण करण्याचे माध्यम आहे. त्याठिकाणी कोणी ही राजकीय हस्तक्षेप करणे योग्य नाही. विस वर्षांपूर्वी गावाची परस्थीती काय होती हे जनतेला माहीती होती व बदलेली परिस्थिती जनतेच्या समोर आहे चार वर्षांपासून प्रशासक आहे या काळात जनतेच्या अनेक समास्या रखडलेल्या आहेत त्या समास्याचे निराकारण झाले पाहिजे म्हणून आपण यापुढे प्रत्येक सोमवारी नागरिकांसाठी मी व माझे सर्व मा.नगराध्यक्ष नगरसेवक नगरपालिकेत उपस्थित रहावुन समास्या सोडवणार आसल्याचे ही बाळराजे पवार यांनी सागितले आहे. स्वच्छ गेवराई सुंदर गेवराईचे जनक लोकप्रिय लोकनेते बाळराजे पवार यांनी गेवराई नगरपालिकेत आढावा बैठक आयोजित करून शहरातील नागरिकांच्या अडचणी समजुन घेत अडचणी मार्गी लावण्यासाठी नगरपालिकेला सुचना केली. यावेळेस शहरातील नागरिकांनी उपस्थित रहावुन पंतप्रधान आवास घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांना पहिला हाप्ता तर काहीना दुसरा हाप्ता मिळालेला नाही. अशा तक्रारी नागरिकांनी करून, आपले गाऱ्हाणे बाळराजे पवार यांच्याकडे माडले. गेली महिन्या पासून शहरातील नाली सफाई झालेली नाही. अनेक ठिकाणी कचरा डेपो साचलेले फोटो दाखवत नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.पंतप्रधान आवास घरकुल योजनेंतर्गत नवान्ये ऑनलाईन केलेले



आहेत त्या संदर्भात अजुन नविन लोकांची यादी जाहीर झालेली नाही. अशा तक्रारारी नागरिकांनी लोकनेते बाळराजे पवार यांच्याकडे नागरीकांनी केल्या आहेत. यावेळी मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, शिवराज पवार, मा.नगराध्यक्ष सुशील जंवजाळ, ब्रम्हदेव धुरंधरे,मा.उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर,सभापती राहुल खंडागळे,भगवान घुबार्डे,जानमहमंद बागवान, याहीया खॉन, दादासाहेब गिरी,मधुकर वादे, प्रमोद मोटे, गणेश मोटे,मा.नगरसेवक आप्पासाहेब कानुडे, राम पवार, संजय इंगळे, मुन्ना सेट, कृष्णा काकडे, राजेंद्र आर्दड, धम्मपाल सौदरमल, बद्दोदिन, छगन आप्पा हादगुले, किशोर धोडलकर,अरुण मस्के, भरत गायकवाड, सय्यद आय्युबभाई, सय्यद एजाज, शिनुभाऊ बेद्रे, आदी उपस्थित होते. दरम्यान, स्वच्छ गेवराई सुंदर गेवराई ब्रिद वाक्य घेऊन लोकनेते बाळराजे दादा पवार यांनी २००६ साली गेवराई नगरपालिकेत बहुमतांने सत्ता स्थापन करून स्वच्छ गेवराई सुंदर गेवराईचे स्वप्न सत्यात आणन्यासाठी गेवराईच्या पवार कुटुंबानी प्रमाणिक प्रयत्न करीत आज गेवराई शहर सुंदर शहर म्हणून नावारुपाला आणले आहे. २०२१ पासुन

# पवारांच्या जनता दरबारास नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**जनता दरबारातील महत्त्वांचे मुद्दे पंतप्रधान घरकुल आवास योजनेंतर्गत चालु असलेल्या लाभार्थ्यांना पहिला व दुसरा हाप्ता वितरण करणे तसेच पंतप्रधान घरकुल आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांना शासन निर्णयानुसार प्रती पाच ब्रास वाळु तात्काळ उपलब्ध करुन द्यावी शहरातील नाले सफाई , तसेच वार्डा वॉर्डात बंद असलेली लाईट तात्काळ चालु करावी अशा अनेक समास्यावर जनता दरबारात चर्चा करण्यात आली**

नगरपालिकेवर प्रशासक काळात नागरिकांच्या अनेक अडचणी निर्माण होत आहेत म्हणून नागरिकांच्या मागणी वरून बाळराजे दादा पवार यांनी गेवराई नगरपालिकेत आढावा बैठक घेण्यात आली आहे. यावेळी समाधान मस्के, रामतात्या पवार, शिवाजी काळे, बाबुराव गवारे, इम्रान पठाण, नितीन शेट्टे, पिटु साळवे, प्रकाश उपळकर, लक्ष्मण चव्हाण,शेख शब्बीर, शेख मुददशीर,राजेंद्र तापडीया, शेख बाबा, बंडु रोकडे,रमेश चव्हाण, विशाल पवार, सुदंर काकडे,प्रशांत राख,पप्पु भोसले, मुरली सुतार, रजित खाजेकर, शेख उस्मान, बाळासाहेब गायकवाड, योगेश मोटे, मुन्ना मोटे,गोरख मोटे,राम लिबोरे, प्रकाश बर्डे,बप्पा जाधव, कदीर बागवान, हामीद बागवान, विनायक गिरी,राणा कानाडे, धुरधुरे, शेख राजु, शौकत पठाण, शेख ईर्शाद, कृष्णा पाटोळे आदींसह वॉर्डातील महिला,नागरिक युवावर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

# लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थी महिलांसाठी ! जुलैचा हप्ता जमा होण्याआधीच गूड न्यूज..

मुंबई वृत्तसेवा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थी महिलांसाठी आताची सर्वात महत्त्वाची बातमी समोर येत आहे. लाडकी बहिण योजनेबाबत बोलायचं झालं तर या योजनेची सुरुवात जुलै २०२४ पासून झाली आहे.गेल्या वर्षी जून महिन्यात या योजनेची घोषणा करण्यात आली आणि जुलै महिन्यापासून या योजनेच्या पात्र महिलांना दरमहा पंधराशे रुपये दिले जाऊ लागलेत.या योजनेच्या पात्र लाभार्थी महिलांना आतापर्यंत एकूण १२ हप्ते देण्यात आले आहेत.

या योजनेला नुकताच बारा महिन्यांचा काळ पूर्ण झाला असून पात्र महिलांच्या खात्यात जुलै २०२४ ते जून २०२५ या कालावधीमधील एकूण १२ हप्ते वर्ग करण्यात आले आहेत.या योजनेचा बारावा हप्ता जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पात्र महिलांच्या खात्यात जमा करण्यात आला.




बाराव्या हप्त्यासाठी आवश्यक ३६०० कोटी रुपयांच्या निधी वितरण ३० जून २०२५ रोजी मान्यता मिळाली होती आणि त्यानंतर जुलै च्या पहिल्या आठवड्यात लाडक्या बहिणींच्या खात्यात १२ व्या हप्त्याची रक्कम वर्ग करण्यास सुरुवात झाली.

मात्र या योजनेचा बारावा हप्ता राज्यातील अनेक लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा झालेला नसल्याची तक्रार देखील समोर आलेली आहे.

दरम्यान अशी सगळी परिस्थिती असतानाच राज्यातील लाडक्या बहिणींसाठी जुलै चा हप्ता जमा होण्याआधीच एक मोठी गुड न्यूज समोर आली आहे.या महिलांना मिळणार तीन हजार रुपयांचा हप्तामिळालेल्या माहितीनुसार, ज्या महिलांना जून महिन्याचा हप्ता मिळालेला नाही त्यांना जून महिन्याचा हप्ता आणि जुलै महिन्याचा हप्ता सोबतच दिला जाऊ शकतो. म्हणजेच जून आणि जुलै या दोन महिन्यांचे तीन हजार रुपये अशा महिलांच्या खात्यात जमा होणार असल्याचा दावा मीडिया रिपोर्टमध्ये करण्यात आला आहे.

तथापि, या संदर्भात सरकारकडून कोणतीच अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही यामुळे खरंच जुलै महिन्याच्या हप्त्यासोबत जून महिन्याचा हप्ता सुद्धा मिळणार का ही गोष्ट विशेष पाहण्यासारखी ठरणार आहे.

जुलैचा हफ्ता कधी मिळणार ?जून महिन्याचा हप्ता प्रत्यक्षात जुलैच्या पहिल्या आठवड्यात पात्र महिलांच्या खात्यात जमा करण्यात आला. यामुळे जुलै महिन्याचा हप्ता ऑगस्टमध्ये मिळणार की काय असा सवाल आहे.पण काही मीडिया रिपोर्ट्स मध्ये जुलैचा लाभ जुलै महिन्यातच मिळेल असे बोलले जात आहे. जुलै महिन्याचा हप्ता हा या महिन्याच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवड्यात जमा होण्याची दाट शक्यता आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक संजय रघुनाथ हांगे यांनी ओम ऑफसेट, क्रांतीनगर, तहसीलच्या मागे, डी.पी.रोड बीड, ता.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक साप्ताहिक अक्षर वार्ता कार्यालय,क्रांतीनगर, तहसील कार्यालयाच्या मागे, डी.पी.रोड, बीड ता.जि.बीड पिन –४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले आहे. संपादक : संजय रघुनाथ हांगे,मो.९७६६२६८४१५ Email : aksharwartanews@gmail.com

The Newspaper Printed, Published and Owend by SANJAY RAGHUNATH HANGE and Printed at OM OFFSET, Kranti Nagar, Behind Tahasil Office, D.P. Road, Tq, Dist. Beed 431122 (Maharashtra) and published at office Of DALY SAPTAHIK AKSHAR VARTA , Kranti Nagar, Behind Tahasil Office, D.P. Road, Tq, Dist. Beed 431122 (Maharashtra) Editor : SANJAY RAGHUNATH HANGE Mo : 9766268415